महाराष्ट्र शासन
गृह विभाग
कारागृह व सुधारसेवा विभाग

सुधारणा व पुनर्वसन
फोन क्र : (०२०) २६१२३५६३
फॅक्सक्र: (०२०) २६१२५८७८
Email-igoffice.ddo-mh@gov.in

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
जुनी मध्यवर्ती इमारत, २ रा मजला,
पुणे ४११ ००१

---

परिपत्रक

**जा.क्र.अपोमसंवकामनि/पुणे/क-५/कुकनि/शिष्युवृत्ती/ 101 /२०२४/ दि. 03 /०१/२०२४**

**विषय:-सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षासाठी कुटुंब कल्याण निधीतून अधिकारी/कर्मचा-यांच्या मुला-मुलींना शिष्युवृती व बक्षिस रुपाने आर्थिक मदत देणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की,कारागृह विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या मुला-मुलींना प्रत्येक वर्षी शिष्यवृत्ती व बक्षिस वाटप करण्यात येते.

यास्तव सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षासाठी कारागृह अधिकारी/कर्मचारी यांच्या मुला-मुलींना बक्षिस व शिष्यवृती वाटप करण्यासाठी विभागीय कारागृह उपमहानिरीक्षक यांनी त्यांचे कार्यालय व अधिनस्त कारागृहातील पात्र अधिकारी/कर्मचारी यांच्या सदरचे परिपत्रक निर्दशनास आणून द्यावे व याबाबतचे प्रस्ताव **एकत्रित संकलित** करुन सोबत जोडलेल्या निकषानुसार शिफारशीसह **दिनांक २९/०२/२०२४** पूर्वी मुख्यालयास न चुकता सादर करण्यात यावे.सोबत जोडलेल्या निकषाप्रमाणे सदरचे प्रस्ताव **एकत्रित संकलित** करुन सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी प्रादेशिक विभाग प्रमुख यांची राहील.

तसेच **दिनांक २९/०२/२०२४** नंतर प्राप्त झालेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत त्यामुळे प्राप्त अधिकारी/कर्मचारी यांच्या मुला-मुलींना शिष्युवृती व बक्षिस रुपाने आर्थिक मदत न मिळाल्यास त्यास मुख्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**(अमिताभ गुप्ता)**
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य,पुणे-१

प्रति,

१.विशेष पोलीस महानिारक्षक (कारागृह),पुर्व विभाग,नागपुर
२.कारागृह उपमहानिरीक्षक पुणे / मुंबई / छत्रपती संभाजीनगर
३.प्राचार्य,दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविदयालय,पुणे-06
४.कक्ष अधिकारी (सर्व),अपोमवमकावसुसे यांचे कार्यालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-01
५.कक्ष अधिकारी कक्ष-13 (ई-सेल)अपोमवमकावसुसे यांचे कार्यालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-01
ई-मेल व कारागृह संकेतस्थळावर प्रसिध्दी साठी.

**सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षासाठी कुटुंब कल्याण निधीतून बक्षिस व शिष्युवृत्ती वाटप करणेसाठी खालील निकषानुसार प्रस्ताव सादर करावे.**

---

**१)** दहावी ते बारावी आणि पदवी,पदव्युत्तर या अभ्यासक्रमासाठी प्राप्त होणारे अर्जातील खालील निकषानुसार पात्र अधिकरी/कर्मचा-यांचीच माहिती खालील प्रपत्रात अभ्यासक्रम निहाय क्रमाने माहिती **Microsoft Excel sheet** मध्ये **DV-TTsurekh** या फॉन्टमध्ये तयार करुन सी.डी.मध्ये पाठवावी.

| सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षासाठी कुटुंब कल्याण निधीतून बक्षिस व शिष्युवृत्ती वाटप करणे | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | कार्यालयाचे नांव | अधिकारी/कर्मचारी नावं | पदनाम | मुलाचे/मुलीचे नांव | शैक्षणिक अभ्याक्रम | उत्तीर्ण वर्ष | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | |
| | | | | | | | |
| एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी | प्राविण्य विषय | शिष्युवृत्ती रक्कम | बक्षिस रक्कम | एकूण (12+13) | प्रादेशिक कार्यालय प्रमुखांची शिफारस |
| ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |

**२) शैक्षणिक अभ्यासक्रमः-**

**अ) इयत्ता १० ते १२ वी पर्यत पात्रताः-**

कला व वाणिज्य शाखेसाठी प्रथम श्रेणी ६०%,विज्ञान शाखेसाठी ७०% किंवा त्या पुढीलसाठी शिष्युवृत्तीसाठी रुपये ३,०००/-तसेच एखाद्या विषयात प्राविण्य असल्यास कला/वाणिज्य शाखेसाठी ७५ %, विज्ञान शाखेसाठी ८० % किंवा त्यापुढील साठी बक्षिस रुपये २,०००/- पर्यत देण्यात येईल.**(एकुण गुण व प्राविण्य विषय हे दोन निकष पुर्ण करत असेल त्यांना रक्कम रुपये पाच हजार देण्यात येईल,एका पेक्षा जास्त विषयात प्राविण्य गुण मिळाल्यास फक्त एकच विषय ग्राहय धरावा)**

**ब) सर्व शैक्षणिक पदवी व पदव्युत्तर,पदविकाः-**

**(कला,वाणिज्य,विज्ञान,अभियांत्रिकी,वैद्यकीय) :-**प्रथम श्रेणी ६०% व त्यापुढील साठी फक्त शिष्युवृत्ती रुपये ३,०००/- पर्यत देण्यात येईल.**(या मध्ये प्राविण्य हा निकष विचारात घेवु नये)**

**३)** सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षातील **दिनांक १/७/२०२२ ते ३०/६/२०२३** या कालावधीतील पात्र गुणपत्रिकानुसार अधिकारी/कर्मचा-यांचे अर्ज विचारात घेतले जातील.

**४)** विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत किंवा पुढील वर्षात वाटप होणा-या शिष्युवृत्तीसाठी पात्र केले जाणार नाहीत.

**५)**सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षासाठी पदवी,पदव्युत्तर,पदविका या अभ्यासक्रमाच्या निकालाच्या गुणपत्रिकेतील दि.१/७/२०२२ ते ३०/६/२०२३ पर्यत असतील अशाच अधिकारी /कर्मचा-यांचे अर्ज ग्राहय धरावे.

६) वरील अभ्यासक्रमाच्या गुणपत्रिकेत दि.१/७/२०२२ व त्यापुढील दिनांक असल्यास अशा कर्मचा-यांचे अर्ज व दिनांक ३०/७/२०२२ रोजी व त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचा-यांना दि.१/७/२०२२ ते ३०/६/२०२३ या कालावधीत पात्र असलेल्या गुणपत्रिकानुसार लाभ मिळणेसाठी त्यांचेही अर्ज स्वतंत्र पाठवावे.

७) पदवी,पदव्युत्तर,पदविका या अभ्यासक्रमाच्या अंतिम निकालाची गुणपत्रिका विचारात घेण्यात यावी.**सेमीस्टर किंवा इतर मध्यावधी चाचण्यांचे निकाल/गुणपत्रिका विचारात घेण्यात येवू नये.**

८) सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षासाठी कुटुंब कल्याण निधीतून बक्षिस व शिष्युवृत्ती वाटप करणेसाठी मुख्यालयाकडून नमूद केलेल्या निकषामध्ये अधिकारी/कर्मचारी यांचे विनंती अर्ज बसत नसल्यास त्यांचे विनंती अर्ज मुख्यालयास सादर करु नये फक्त पात्र अधिकारी/कर्मचारी यांचेच अर्ज मुख्यालयास सादर करणेबाबतची दक्षता

घेण्यात यावी.ज्या अधिकारी/कर्मचारी यांचे मुख्यालयाचे निकषाप्रमाणे विनंती अर्ज नसतील तर ते अपात्र करुन त्यांना आपले स्तरावरुन लेखी समज देण्यात यावी.

९) मुख्यालयाने दिलेल्या तक्यामध्ये कोणताही नवीन कॉलम आपले स्तरावर वाढविण्यात येवू नये व मर्ज **(कमी)** करण्यात येवू नये असे केल्याचे निर्दशनास आल्यास असा प्रस्ताव मुख्यालयस्तरावर दप्तरी दाखल करण्यात येईल व याबाबत आपले कार्यालयास कोणतेही लेखी स्वरुपात कळविण्यात येणार नाही.

१०) सेवानिवृत्त, रजेवर अथवा निलंबित असलेल्या कर्मचा-यांना विहित मुदतीत अर्ज सादर करणेबाबत समज देण्यात यावी.

११) कारागृह व सुधारसेवा विभागातील किंवा इतर विभागातील (प्रतिनियुक्ती) अधिकारी/कर्मचारी हे कुटुंब कल्याण निधीचा सभासद (वर्गणीदार) असणा-यांचे अर्ज ग्राहय धरावे.

१२) गुणपत्रिकेची मागील व पुढील दोन्ही बाजूची स्पष्ट दिसणारी साक्षांकित केलेली छायाकिंत प्रत जोडावी.

१३) प्रादेशिक कार्यालय प्रमुखांनी सदरचे प्रस्ताव सादर करताना ते बिनचुक व मुख्यालयाने दिलेल्या सूचनांप्रमाणे सादर करावे व ती सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी प्रादेशिक कार्यालय प्रमुखांची आहे.

१४) सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षासाठी कुटुंब कल्याण निधीतून बक्षिस व शिष्युवृत्ती वाटपासाठी जे अधिकारी/कर्मचारी दिलेल्या मुदतीनंतर विनंती अर्ज कार्यालयास सादर करतील अशा अधिकारी/कर्मचारी यांचे विनंती अर्ज आपले कार्यालयात जमा करावे व तशी लेखी समज संबंधितांना देण्यात यावी.